**आरबीआय/२००७-०८/२०**
**महापरिपत्रक क्र.०४/२००७-०८**

**जुलै २, २००७**

प्रति

विदेशी मुद्रेचा व्यापार करणाऱ्या सर्व बँकांना

**महोदया/ महोदय,**

**अनिवासी भारतीय / भारतीय वंशाची व्यक्ती / परदेशातील नागरिक यांच्यासाठी असलेल्या धनप्रेषण सुविधेबाबतचे महापरिपत्रक**

अनिवासी भारतीय / भारतीय वंशाची व्यक्ती / परदेशातील नागरिक यांच्यासाठी असलेल्या धनप्रेषण सुविधांचे नियंत्रण, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या कलम (६) च्या उपकलम (१) व (२) अन्वये व त्यासह फेमा सूचनापत्र क्र. १३/२०००-आरबी, तसेच फेमा सूचना पत्र क्र.२१/२००० आरबी, दि. मे ३, २००० यासह व त्यांच्यामधील वेळोवेळी केलेल्या सुधारण्यांच्या अन्वग्र केले जाते.

(२) या महापरिपत्रकात, **"अनिवासी भारतीय/ भारतीय वंशाच्या व्यक्ती/ परदेशी नागरिक यांच्यासाठी असलेल्या वित्तप्रेषण सुविधां "** बाबतचे, सध्या अस्तित्वात असलेले सर्व निदेश एकाच जागी एकत्रित करण्यात आले आहेत. या महापरिपत्रकात एकत्रित करण्यात आलेल्या सुचनापत्रांची यादी परिशिष्टात देण्यात आली आहे.

(३) हे महापरिपत्रक फक्त एक वर्षासाठी लागु असेल आणि ते जुलै १, २००८ रोजी रद्दबातल केले जाऊन याच विषयावरील अद्यावत केलेले महापरिपत्रक प्रसृत केले जाईल.

आपला विश्वासु,

**(सलिम गंगाधरन)**
**मुख्य महाव्यवस्थापक**

## अनुक्रमणिका

(१) अनिवासी भारतीय (एन आर आय) व भारतीय वंशाचे लोक (पीआयओ) ची व्याख्या ---३

(२) सध्याच्या प्राप्तीचे / उत्पान्नाचे प्रेषण---------------------------------------------------------------------३

(३) भारतीय वंशाच्या नसलेल्या विदेशी नागरिकाकडून मालमत्तेचे प्रेषण ----------------------------४

(४) एन आर आय / पी आय ओ यांच्याद्वारे मालमत्तेचे प्रेषण--------------------------------------------५

(५) विदेशी चलन देऊन एन आर आय / पी आय ओ यांनी खरेदी केलेल्या व नंतर विक्री केलेल्या मालमत्तेच्या मोबदल्याचे (प्रोसिडस) प्रत्यावर्तन --------------------------------------------- ५

(६) विद्यार्थ्यांसाठी सुविधा ---------------------------------------------------------------------------------५

(७) आयकर परवानगी (क्लिअरन्स)----------------------------------------------------------------------६

(८) आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डस---------------------------------------------------------------------------७

परिशिष्ट----------------------------------------------------------------------------------------------------------८

**<u>अनिवासी भारतीय (एन आर आय) / भारतीय वंशाचे लोक (पीआयओ) आणि विदेशी नागरिक यांच्यासाठी धनप्रेषण सुविधा</u>**

एखादी व्यक्ती भारतातील नागरीक असो अथवा नसो, तिने भारताबाहेर मालमत्तेचे हस्तांतरण करण्यासाठी असलेले विनियम, परिपत्रक क्र. फेमा /१३/२०००-आरबी आणि फेमा २१/२००० आरबी दोन्हीही दि.मे ०३, २००० व या परिपत्रकांच्या सुधारणांमध्ये दिले गेले आहेत. त्यानुसार, एखादी व्यक्तीने मग ती भारतीय किंवा भारताबाहेरील नागरीक असो त्याच्या भारताबाहेरील भांडवली मालमत्तेचे धनप्रेषण करण्यासाठी, फेमा मध्ये तरतुदी किंवा त्याखालील नियम व विनियम वगळून, रिझर्व्ह बँकेची मंजुरी घेतली गेली पाहिजे.

**<u>(१) एन आर आय / पी आय ओ च्या व्याख्या</u>**

एन आर आय - अनिवासी भारतीय ची व्याख्या म्हणजे भारताबाहेर राहणारी भारताचा नागरिक असेलली व्यक्ती.

फेमा परिपत्रक क्र. १३ दि. मे.३,२००० च्या विनियम २ मधील अटी / शर्तीनुसार, अनिवासी भारतीय (एन आर आय) वंशाची व्यक्ती ( पी आय ओ) म्हणजे बांग्लादेश किंवा पाकिस्तान सोडून दुसऱ्या कोणत्याही देशाची नागरीक व्यक्ति अ) कधीतरी भारतीय पासपोर्ट होता किंवा ब) तो किंवा त्याचे आईवडील किंवा त्याचे कोणतेही आजी आजोबा पैकी कोणीही एक भारताच्या घटनेने किंवा नागरिकत्व अधिनियम १९५५ च्या अन्वये भारताचा नागरिक होता किंवा क) ती व्यक्ति अ) किंवा ब) मध्ये निर्देश केलेल्या व्यक्तीचा पति किंवा पत्नी असल्यास,

**(२) सध्या असलेल्या उत्पन्नाचे धनप्रेषण**

(२.१) एनआरओ खाते न ठेवणाऱ्या एनआरआय / पीआयओ यांच्या, भाडे, लाभांश, निवृत्तीवेतन, व्याज यासारख्या सध्या असलेल्या उत्पन्न धनप्रेषण, प्रस्तावित धनप्रेषणाची रक्कम धनप्रेषणासाठी पात्र असून लागु असणारे कर भरण्यात आले आहेत/त्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे अशा, चार्टर्ड अकाउंटंटच्या प्रमाणपत्राच्या आधारावरच करण्याची खुली परवानगी आहे.

(२.२) एनआरआय/ पीआयओ यांना सध्या येत असलेले उत्पन्न त्यांच्या अनिवासी (बाह्य) रुपया खात्यामध्ये जमा करण्याचा पर्याय आहे, मात्र, अशी जमा केलेली रक्कम ही त्या अनिवासी खातेदाराचे सध्या येत असलेले उत्पन्नच असून त्यावर आयकर भरला गेला आहे / त्याची व्यवस्था केली गेली आहे याबाबत अधिकृत डीलर बँकेचे समाधान झाले असले पाहिजे.

**<u>(३) अभारतीय वंशाच्या विदेशी नागरिकाकडून मालमत्तेचे प्रेषण</u>**

३.१ भारतातील नोकरीमधून निवृत्त झालेला अ - भारतीय वंशाचा नागरिक किंवा भारतामधील रहिवाशाकडुन वारसाहक्काने मालमत्ता मिळविलेली व्यक्ती किंवा भारतात राहणाऱ्या भारतीय नागरिकाची विधवा पत्नी, त्या मिळकतीला / वारसाहक्काला पुष्टी देणारे कागद पत्र सादर करुन तसेच प्रेषण करणाराचे हमीपत्र (अंडरटेकिंग) आणि सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस यांच्या

परिपत्रक क्र. १०/२००२ दि. ऑक्टोबर ९, २००२ अनुसार नियत केलेल्या नमुन्यामध्ये, चार्टड अकाउंटंटचे प्रमाणपत्र सादर करुन, दर कॅलेंडर वर्षासाठी, युएस डॉलर्स १० लक्षांपेक्षा अधिक नसलेल्या रक्कमेचे धनप्रेषण करु शकते.

३.२ तथापि ही धनप्रेषण सुविधा नेपाळ व भूतानच्या रहिवाशांसाठी लागु नाही.

## (४) एनआरआय / पीआयओद्वारा धनप्रेषण

(४.१) एखादी अनिवासी भारतीय व्यक्ती (एनआरआय) किंवा भारतीय वंशाची व्यक्ति (पीआयओ), त्या व्यक्तीच्या "अनिवासी" (सर्वसाधारण) रुपये खात्यामधील (एनआरओ) शिल्लक रकमेतून / मालमत्तेची विक्री करुन आलेल्या मोबदल्यामधून (तडजोड व वारसा हक्काने मिळालेल्या मालमत्तेसह), अहेतुबाबत अधिकृत डीलर बँकेचे समाधान झाले असल्यास, तसेच प्रेषण कर्त्याचे हमीपत्र व नियत केलेल्या नमुन्यात चार्टर्ड अकाउंटंटचे सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस यांच्या ९ ऑक्टोबर, २००२ च्या परिपत्रक क्र. १०/२००२ मधील नमुन्यानुसार प्रमाणपत्र सादर करुन, दर कॅलेंडर वर्षासाठी युएस डॉलर्स १० लक्ष पर्यंतच्या रक्कमेचे धनप्रेषण करु शकते.

(४.२) एनआरआय / पीआयओ, किंवा वरील परिच्छेद २.१ मध्ये दिल्याप्रमाणे भारतात राहणारी व्यक्ती रुपयांच्या स्वरुपातील निधीमधून विकत घेतलेल्या स्थावर मालमत्तेचे विक्रीमधून मिळालेला मोबदल्याचे कोणत्याही संरुध्द कालाशिवाय धनप्रेषण करु शकते.

(४.३) वारसाहक्काने किंवा मृत्युपत्रानुसार मिळालेल्या किंवा संरुध्द्काल (लॉक - इन पिरियड) नसलेल्या तडजोडीतून मिळालेल्या मालमत्तेच्या विक्रीमधून मिळालेल्या मोबदल्याचे धनप्रेषण करतांना, एनआरआय/ पीआयओ यांनी अशा वारसाहक्काने किंवा मृत्युपत्रानुसार मिळालेल्या मालमत्तेबाबतचा कागदोपत्री पुरावा, प्रेषणाकर्त्याचे हमीपत्र, आणि नियत केलेल्या नमुन्यांमध्ये चार्टर्ड अकाउंटंट्ने दिलेले प्रमाणपत्र सादर करावे. आई - वडिलांकडून मिळालेला वारसाहक्क हा तडजोडीच्या स्वरुपात ही असू शकेल. त्यातील फरक म्हणजे, तडजोडीबाबतची मालमत्ता, मूळ मलक / आई-वडिल यांच्या मृत्युनंतर कोणत्याही कायदेशीर कार्यरीती / कटकटीशिवाय लाभार्थीकडे जाते. आणि त्यामुळे विलंब, प्रोबेटसाठी अर्ज करणे इत्यादि असुविधा टळतात.

(४.४) अ) स्थावर मालमत्तेची विक्री करुन मिळालेल्या मोबदल्याचे धनप्रेषण करण्याची सुविधा, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, चीन, अफगाणिस्तान, इराण, नेपाळ व भूतान येथील नागरीकांसाठी उपलब्ध नाही.
ब) इतर आर्थिक मालमत्तेच्या विक्रीच्या रकमेच्या प्रेषणाची सुविधा, पाकिस्तान, बांग्लादेश, नेपाळ व भूतान येथील नागरिकांना उपलब्ध नाही.

## (५) विदेशी चलनातून, एनआरआय / पीआयओ यांनी विकत घेतलेल्या निवासी मालमत्तेच्या विक्रीमधून मिळालेल्या मोबदल्याचे प्रत्यावर्तन

५.१ एन आर आय / पीआयओ यांनी खरेदी केलेल्या निवासी मालमत्तेच्या विक्रीचा मोबदल्याचे प्रत्यावर्तन बँकिंग वाहिन्यांमधून (चॅनल्स) मिळालेल्या विदेशी चलनाने , स्थावर मालमत्तेच्या खरेदीसाठी दिलेल्या रकमेपुरतीच लागु आहे. मात्र ही सुविधा अशा दोन मालमत्तांपुरतीच मर्यादित आहे.

(५.२) गृहबांधणी संस्था / विक्रेते यांना, त्यांना प्लॉट न दिला गेल्याबद्दल निवासी/ व्यापारी मालमत्तेचे खरेदीसाठी त्यांनी केलेले बुकिंग रद्द झाल्याबद्दल, तसेच अर्जाचे शुल्क / बयाणा रक्कम / खरेदीसाठी दिलेली रक्कम (कन्सिडरेशन) यांच्या परताव्याच्या रकमांचे प्रत्यावर्तन, त्यावरील (असल्यास) व्याजासह (त्यावरील आयकर देय असेल) करण्याची परवानगी अधिकृत डीलर बँका परवानगी देऊ शकतात - मात्र त्यासाठी भरलेली मुळ रक्कम ही खातेदाराच्या एनआरई / एफसीएनआर खात्यातून दिली गेली असली पाहिजे किंवा नेहमीच्या / नियमित बँकिंग मार्गाने भारताबाहेरुन त्या रकमेचे धनप्रेषण केले गेले आहे याबाबतच्या व्यवहाराचे अधिकृत डीलर बँकेचे समाधान असले पाहिजे. एनआरआय / पीआयओ यांची तशी इच्छा असल्यास असा निधी त्यांच्या एनआरई/एफसीएनआर खात्यांमध्ये जमा केला जाऊ शकतो.

(५.३) एनआरआय/ पीआयओ यांनी अधिकृत डीलर बँकांकडून / गृह वित्तसंस्थांकडून कर्ज घेऊन खरेदी केलेल्या निवासी जाग्यांच्या विक्रीच्य रक्कमेचे प्रत्यावर्तन करण्यास अधिकृत डीलर बँका परवानगी देऊ शकतात. मात्र अशा कर्जांची परतफेड ही नेहमीच्या / नियमित मार्गामधून आलेल्या / पाठविलेल्या विदेशी धनप्रेषणाच्या स्वरुपात किंवा त्यांच्य एनआरई / एफसीएनआर खात्यामधून ती रक्कम वजा केल्याच्या स्वरुपात असली पाहिजे.

## (६) विद्यार्थ्यांची सुविधा

(६.१) शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अनिवासी भारतीयच (एनआरआय) समजण्यात येते आणि फेमाखाली एनआरआयना मिळणाऱ्या सर्व सुविधा मिळविण्यासाठी ते पात्र आहे.

(६.२) अनिवासी या नात्याने ते भारतामधून (१) भारतातील जवळच्या नातेवाईकांपासून युएस डॉलर्स १००.००० पर्यंतची रक्कम स्वघोषणेवर चरितार्थासाठी - यात शिक्षणाचा खर्च समाविष्ट आहे - आणि (२) त्यांच्या मालमत्तेच्या विक्री - मोबदल्यामधून / भारतातील एडी बँकेत असलेल्या खात्यामधील शिल्लक रक्कमेमधून युएस डॉलर्स १० लक्ष पर्यंतच्या धनप्रेषणासाठी पात्र आहेत. तथापि वरील परिच्छेद २.२ मध्ये दिलेली बंधने, स्थावर मालमत्तेच्या विक्रीतून मिळालेल्या मोबदल्याच्या धनप्रेषणाच्या बाबतीत लागु होतील.

(६.३) फेमा खाली एनआरआयना उपलब्ध असलेल्या सर्व सुविधा विद्यार्थ्यांना समानतेचे लागु होतील.

(६.४) त्यांनी घेतलेली शैक्षणिक व इतर कर्जे फेमामधील विनियमांच्या अनुसार त्यांना उपलब्ध होणे सुरु राहील.

## (७) आयकर परवानगी (क्लिअरन्स)

सेंट्रल बोर्ड ऑफ टॅक्सेस, वित्त मंत्रालय, भारत सरकार, यांनी त्यांच्या परिपत्रक क्र. १०/ २००२ दिनांक ऑक्टोबर ९, २००२ (तुलना करा - ए पी (डी आय आर सिरीज) परिपत्रक क्र. ५६, नोव्हेंबर २६, २००२ ) यात नियत केलेल्या नमुन्यांमध्ये चार्टर्ड अकाउंटंटने दिलेले प्रमाणपत्र व प्रेषणकर्त्याचे हमीपत्र सादर केल्यानंतरच अधिकृत डीलर बँकाकडून धनप्रेषण करु दिले जाईल.

**(८) आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डस**

आरबीआयच्या पूर्व - परवानगीशिवाय एनआरआय / पीआयओ यांना आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डे देण्यासाठी अधिकृत डिलर बँकांना परवानगी देण्यात आली आहे. अशा व्यवहारांची तडजोड (सेटलमेंट) अंतर्गत धनप्रेषण करुन किंवा कार्डधारकाच्या एफसीएनआर / एनआरई/ अनिवासी (सर्वसाधारण) रुपये खात्यांमध्ये असलेल्या शिल्लक रकमेमधून केली जावी.

**परिशिष्ट**

या महापरिपत्रकात अनिवासी भारतीय / भारतीय वंशाच्या व्यक्ती / विदेशी यांच्यांसाठी धनप्रेषण सुविधांवरील एकत्रित केलेल्या अधिसूचना / परिपत्रकांची यादी

| **अनु. क्र.** | **अधिनियम/परिपत्रक क्र.** | **दिनांक** |
|---|---|---|
| १ | अधिनियम क्र. एफइएमए ६२/२००२ - आरबी | १३ मे, २००२ |
| २ | अधिनियम क्र. एफइएमए ६५/२००२ - आरबी | २९ जून, २००२ |
| ३ | अधिनियम क्र. एफइएमए ९३/२००३ - आरबी | ९ जून, २००३ |
| ४ | अधिनियम क्र. एफइएमए ९७/२००३ - आरबी | ८ जुलै, २००३ |
| ५ | अधिनियम क्र. एफइएमए ११९/२००४ - आरबी | २९ जून, २००४ |
| १ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.४५ | १४ मे, २००२ |
| २ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.१ | २ जुलै, २००२ |
| ३ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.५ | १५ जुलै, २००२ |
| ४ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.१९ | १२ सप्टेंबर, २००२ |
| ५ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.२६ | २८ सप्टेंबर, २००२ |
| ६ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.२७ | २८ सप्टेंबर, २००२ |
| ७ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.३५ | १ नोव्हेंबर, २००२ |
| ८ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.४० | ५ नोव्हेंबर, २००२ |
| ९ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.४६ | १२ नोव्हेंबर, २००२ |
| १० | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.५६ | २६ नोव्हेंबर, २००२ |
| ११ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.६९ | ९ डिसेंबर, २००२ |
| १२ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.६७ | १३ जानेवारी, २००३ |
| १३ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.१०१ | ५ मे, २००३ |
| १४ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.१०४ | ३१ मे, २००३ |
| १५ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.४३ | ८ डिसेंबर, २००३ |
| १६ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.४५ | ८अ डिसेंबर, २००३ |
| १७ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.६२ | ३१ जानेवारी, २००४ |
| १८ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.४३ | १३ मे, २००५ |
| १९ | एपी (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र.१२ | १६ नोव्हेंबर,२००६ |